# ‘मेट्रो-३’बाधितांचे स्थलांतर पूर्ण

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भूमिगत मेट्रो-३ प्रकल्पातील प्रकल्पबाधितांच्या तात्पुरत्या स्थलांतरणाचे काम पूर्ण झाल्याने मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. प्रामुख्याने गिरगाव व काळाबादेवी येथील प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतर व तात्पुरते पुनर्वसन ही आव्हाने होती.

या प्रकल्पात गिरगाव व काळबादेवी ही दोन प्रमुख मेट्रो स्थानके आहेत. कुलाबा ते सीप्झ या पट्ट्यात प्रामुख्याने या दोन विभागांत १९ इमारतींतील ६३४ कुटुंबे बाधित आहेत. साहजिकच स्थलांतरणाचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हापासून तो संवेदनशील बनला होता. सुरुवातीला प्रकल्पबाधितांनी स्थलांतरास नकार दिला. त्याशिवाय राजकीय पक्षांनीही या प्रकरणात उडी घेतल्यामुळे मोठा पेच निर्माण झाला होता. मात्र कॉर्पोरेशनच्या अध्यक्ष अश्विनी भिडे यांनी संबंधितांशी अनकेदा बैठका घेऊन त्यांना प्रकल्पाचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर प्रकल्प पूर्ण होईपर्यंत अन्यत्र तात्पुरते स्थलांतर केले जाईल व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मूळ ठिकाणीच नव्या इमारती बांधून कायमस्वरूपी पुनर्वसन केले जाईल, याची ग्वाही दिल्यानंतर रहिवाशांचा विरोध मावळला व त्यांनी सहकार्य दिले.

## प्रकल्पातील महत्त्वाचा टप्पा पार



या भागात जवळपास २९३ निवासी, तर ३४१ व्यावसायिक गाळेत आहेत. जागेच्या उपलब्धतेनुसार त्यापैकी काहींचे स्थलांतर परिसरातच करण्यात आले आहे, तर काहींना भाडे देऊन अन्यत्र स्थलांतराचा पर्याय देण्यात आला. त्या-त्या भागातील सध्याच्या बाजारभावानुसार रहिवाशांना ११ महिन्यांच्या आगाऊ भाड्याच्या रकमाही देण्यात आल्या आहेत. शिवाय घरातील सामान अन्यत्र नेण्यासाठी येणाऱ्या वाहतूक खर्चापोटी २५ हजार रुपयेही दिले आहेत.

आतापर्यंत या भागातील प्रकल्पबाधितांच्या सर्व इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच गिरगावातील सर्वांत जुनी क्रांतीनगर वसाहत रिकामी करण्यात आली. या सर्व इमारती पाडल्यामुळे प्रकल्पाला गती मिळाली असून प्रकल्प पूर्णत्वास येत असताना या जागेवर येत्या काही वर्षांत नव्या इमारतीही बांधल्या जाणार आहेत.